आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० एप्रिल २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकार आगामी जनगणनेत जातनिहाय गणना करणार
- २०२५ च्या खरेदी हंगामाकरता ऊसाला ३ हजार ५५० रुपये प्रतिटन FRP अर्थात रास्त भाव देण्याचा केंद्रिय मंत्रिमंडळाचा निर्णय
- वेव्ह्ज २०२५, अर्थात पहिली जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषद उद्यापासून मुंबईत सुरु होणार, प्रधानमंत्री करणार उद्घाटन
- राज्य सरकारनं पीक वीमा योजनेत केलेला बदल शेतकऱ्यांवर अन्याय करणारा असून तो रद्द करावा, अशी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांची मागणी

**आणि**

- मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर सेवानिवृत्त, देवेन भारती नवे पोलीस आयुक्त

**<><><><><>**

आगामी जनगणनेत जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय केंद्रसरकारनं घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत झालेल्या मंत्रीमंडळाच्या राजकीय विषयसंबंधी समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय झाला. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर बातमीदारांना ही माहिती दिली. जातीनिहाय लोकसंख्या पारदर्शीपणे समजावी आणि समाजात ऐक्य स्थापन व्हावं हा याचा हेतू असल्याचं वैष्णव म्हणाले.

ऊसासाठी २०२५ च्या खरेदी हंगामाकरता ३ हजार ५५० रुपये प्रतिटन एफआरपी अर्थात रास्त भाव देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. हा भाव उत्पादन खर्चाच्या १०५ टक्के अधिक आहे, याचा फायदा ५ कोटी ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्यात काम करणाऱ्या ५ लाख कामगारांना होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

शिलाँग ते सिलचर या महामार्ग प्रकल्पाला या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पासाठी २२ हजार ८६४ कोटी रुपये खर्च येणार आहे. १६६ किलोमीटरच्या या मार्गामुळे त्रिपुरा, मणिपूर, मिझोराम आणि आसाम बराक खोरं यांच्यातला संपर्क सुधारणार आहे.

जातनिहाय जनगणना करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्वागत केलं आहे. यामुळे गरजू नागरिकांच्या प्रगतीसाठी धोरणं आखायला यामुळे मदत होईल, असं ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या निर्णयाचं स्वागत केलं आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेनं केंद्र सरकारनं टाकलेलं हे महत्वपूर्ण पाऊल आहे, असं त्यांनी म्हटलंय.

केंद्र सरकारनं घेतलेला जात जनगणनेचा निर्णय फसवा असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. जनगणना कधी करणार याबाबत सरकारने स्पष्ट खुलासा केला नाही. उलट सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात, जातीय जनगणना करणं शक्य नाही असं त्यांनी म्हटलं आहे, त्यामुळे सरकारची भूमिका दुटप्पी असल्याचं आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे. मात्र, ही घोषणा बिहारच्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केली की काय अशी शंका येते असं वडेट्टीवार म्हणाले. ही घोषणा हवेत विरून जाऊ नये, त्याची अंमलबजावणी व्हावी असं ते म्हणाले.

**<><><><><>**

पहिल्यावहिल्या वेव्ह्ज, अर्थात जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन परिषद २०२५ चं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर इथं होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेचा उद्देश, माध्यमं,

मनोरंजन आणि डिजिटल नवोन्मेष क्षेत्रातली भारताची प्रतिभा अधोरेखित करणं, तरुणांसाठी नवनिर्मितीच्या अभिनव संधी उपलब्ध करून देणं आणि त्यांना व्यासपीठ देणं, असा आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड… व्हीसी- अंकिता आपटे**

*(वेव्हज २०२५ साठी स्वप्ननगरी मुंबई सज्ज झाली आहे. १५ हजार वर्ग मीटर परिसरात पसरलेल्या या भव्य परिषदेत माध्यमं, मनोरंजन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या आघाडीच्या व्यक्ती, कंपन्या आणि या क्षेत्रात येऊ पाहणारी नवी प्रतिभा एकत्र येणार आहे. पहिलावहिला जागतिक माध्यम संवादही या परिषदेत होईल, याशिवाय, सर्जक आर्थिक क्षेत्राला चालना देण्यासाठी सर्वसमावेशक वेव्हज बाजार आयोजित केला आहे. गेल्या जवळपास वर्षभराच्या कालावधीत देशभरात झालेल्या ३२ क्रिएट इन इंडिया चॅलेंजमधून निवडलेल्या स्पर्धकांचा क्रिएटोस्फिअर हेही वेव्हज परिषदेचं आकर्षण आहे. ‘कला टू कोड’ या विषयावर आधारित भारत पॅव्हिलियन वेव्हजमध्ये उभारलं आहे. यात, कला, कृती, दृष्टी आणि क्रिएटर्स लीप या चार विभागांद्वारे भारताची समृद्ध कथाकथन परंपरा नागरिकांना अनुभवता येईल. याशिवाय विविध प्रदर्शनं, दालनं, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही वेव्हज २०२५ मध्ये असणार आहे.*

*-आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून अंकिता आपटे.)*

**<><><><><>**

साडे तीन मुहूर्तापैकी एक असलेली अक्षय्य तृतीया सर्वत्र आज साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे पर्व सगळ्यांसाठी यश, वृद्धी आणि प्रसन्नता घेऊन येवो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. महात्मा बसवेश्वर जयंती ही आज सर्वत्र साजरी होत आहे. समाजाप्रति महात्मा बसवेश्वर यांचा दृष्टीकोन आणि उपेक्षितांच्या उत्थानासाठी

त्यांनी केलेले प्रयत्न आजही समाजाला मार्गदर्शन करत असल्याचं सांगत, प्रधानमंत्री मोदी यांनी बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

या शुभदिनी आपल्या जीवनात नवचैतन्य येवो, उत्तम आरोग्य, सुख-समृद्धीने संपूर्ण वर्ष जावो, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सर्वांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही सर्वांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या, तसंच  महात्मा बसवेश्वर महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन केलं.

**<><><><><>**

राज्यात अक्षय्य तृतीयेला अनेक ग्रामीण- दुर्गम भागात बालविवाह लावले जातात. हे विवाह रोखण्यासाठी विविध जिल्ह्यात मोहीम राबवली जात आहे. त्यात, **यवतमाळ**मध्ये होणारे दोन बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आलं आहे. राळेगाव तालुक्यात गोपालनगर आणि दिग्रस तालुक्यात डोळंबा इथं हे बालविवाह होणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास विभागाला मिळाली होती, त्यावरून कारवाई करण्यात आली.

**<><><><><>**

राज्य सरकारनं पीक वीमा योजनेत कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत केलेला बदल चुकीचा असल्याची टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ते आज छत्रपती संभाजी नगर इथं बातमीदारांशी बोलत होते.  हा बदल शेतकऱ्यांवर अन्याय करणारा आहे. म्हणून तो रद्द करावा, आणि आतापर्यंत सुरु असलेली योजनाच पुन्हा लागू करावी, अन्यथा शेतकरी, आणि काँग्रेस पक्ष गप्प बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

नैसर्गिक आपत्ती हंगामातली प्रतिकूल परिस्थिती, आणि काढणी पश्चात झालेल्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांना मिळत होती, ती पद्धतच सरकारनं योजनेतून काढून टाकली आहे. आणि केवळ पीक कापणीच्या आधारावर नुकसान भरपाई

देण्याची पद्धत अवलंबली आहे, असं ते म्हणाले. ‘एक रुपयात विमा’ ही पद्धत बंद करण्याएवजी शासनानं विमा कंपन्यांवर दबाव आणून शेतकऱ्यांना रास्त नुकसान भरपाई कशी मिळेल हे पाहिले पाहिजे, असंही सपकाळ म्हणाले.

**<><><><>**

मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर आज सेवानिवृत्त झाले. फणसळकर यांनी ३० जून २०२२ रोजी आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला होता. ते भारतीय पोलीस सेवेच्या १९८९ च्या तुकडीचे अधिकारी आहेत.

फणसळकर यांच्या जागी विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांची मुंबई पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागानं याबाबतचे आदेश जारी केले आहेत. ५३ वर्षांचे भारती १९९४ च्या तुकडीतले अधिकारी आहेत. अतिरिक्त पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्त या पदावर त्यांनी काम केलं आहे. मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्याचा तपास करणाऱ्या दहशतवादी विरोधी पथकाचं त्यांनी नेतृत्व केलं होतं.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे पुढचे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. पुढील महिन्याच्या १४ तारखेपासून ते आपला कार्यभार सांभाळतील, अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांचा सामना होणार आहे. चेन्नईतल्या एम.ए चिदंबरम स्टेडियमवर थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

भारतीय शालेय प्रमाणपत्र परीक्षा परिषदेने आयएससीई इयत्ता १० वी आणि आयएससी इयत्ता १२ वी चे निकाल आज जाहीर केले. दोन लाख पन्नास हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती तर ९९ हजार पाचशे एकावन्न विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. दहावीत ९९ पुर्णांक ३७ टक्के गुणांसह मुलींनी वर्चस्व राखलं तर एकुण ९८ पूर्णांक ८४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दरम्यान, बारावीच्या परीक्षेतही मुलींनी चांगली कामगिरी केली असून ९९ पुर्णांक ४५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर विद्यार्थ्यांचं उत्तीर्ण होण्याचं प्रमाण हे ९८ पुर्णांक ६४ टक्के इतकं राहीलं. विद्यार्थांना cisce.org आणि results.cisce.org या संकेतस्थळावर आपला निकाल पाहता येणार आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**